# स्वत:च्या जातीसाठी रणशिंग फुंकणारे मनोज जरांगे, लक्ष्मण हाके यांचा दलित समाजातील तरूणाच्या अमानुष घटनेवर आवाज का उमटत नाही?

## बीड जिल्ह्यात जातीय राजकारणासाठी आणि संतोष देशमुखांसाठी आंदोलन करणाऱ्या राजकीय नेत्यांचे यश ढाका प्रकरणात बोलायला तोंड शिवले का?

सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
● संपादक :- दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

**सत्ताधारी- विरोधक दोघंही मूकबधिर, यश ढाका हत्येवर मौन बाळगणारे नेते समाजासमोर उघडे पडले?**

**जातीय संघर्षावर राजकारण, पण वाल्मिकी तरुणाच्या हत्या प्रकरणात नेत्यांनी न्यायाची बाजू का विसरले?**

# पत्रकाराच्या मुलाची दिवसाढवळ्या हत्या; पण मीडियाचा दुटप्पी चेहरा उघडा, यश ढाकाला गटबाजीच्या रंगात रंगवण्याचा प्रयत्न?

## घटनेचा सिसिटिव्ही फुटेज सांगतं अनेक आरोपी मात्र पोलिस अहवाल बनावट करून फक्त एकच नाव, सत्य दडपलं जातंय का?







**बीड (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील तरुण यश ढाका याचा दिवसाढवळ्या खून झाला. यश हा वाल्मिकी समाजाचा तरुण असून त्याचे वडील पत्रकार आहेत. पत्रकाराच्या मुलाची हत्या ही लोकशाहीत थेट माध्यमांवरच आघात आहे. तरीसुद्धा, मोठमोठे राजकीय नेते आणि तथाकथित समाजहितैषी कार्यकर्ते गप्प का आहेत, हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणानंतर मराठा आरक्षणाचे जनक मनोज जरांगे पाटील यांच्यासह अनेक राजकीय नेते तुटून पडले होते. मग यश ढाका प्रकरणात तेच नेते का शांत आहेत? मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे आपापल्या जातीसाठी मोठमोठे आंदोलन करत संघर्ष करत आहेत, पण दलित समाजातील या अमानुष घटनेवर त्यांचा आवाज का उमटत नाही?**

वाल्मिकी समाज दलित समाजामध्ये मोडतो. अशा समाजातील तरुणाची हत्या होऊनही बीड जिल्ह्यातील सह इतर राजकीय नेते, खासदार, आमदार, तथाकथित सामाजिक कार्यकर्ते आणि नेहमी टीव्ही कॅमेऱ्यासमोर धाव घेणारे अंजली दमानिया, संजय राऊत, सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर यांचे तोंड बंद का झाले आहे? मीडियाची भूमिकादेखील लाजिरवाणी ठरतेय. काही नामांकित चॅनेल्सनी या घटनेतून स्वतःची टीआरपी वाढवण्यासाठी वाल्मीक कराडचे नाव ओढून यश ढाकाला त्या गटाचा सदस्य दाखवण्याचा प्रयत्न केला. पत्रकाराचा मुलगा हत्येचा बळी ठरत असताना, मीडिया सत्याला बाजूला ठेवून खोट्या मांडण्या करून प्रेक्षकांची दिशाभूल करत आहे.

आज महाराष्ट्रात जातीयवाद पेटवण्यासाठी आंदोलनं आणि राजकारण करणाऱ्यांना ही घटना का दिसत नाही? यश ढाका प्रकरणातील शांततेने सत्ताधारी व विरोधक या दोघांचंही दुटप्पी राजकारण उघड झालं आहे. दलित पत्रकाराचा मुलगा मारला जातो आणि राजकीय नेते गप्प राहतात, हे महाराष्ट्राच्या लोकशाहीसाठी काळं पान ठरलं आहे. पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश याचा दिवसाढवळ्या खून होतो. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या अमानुष घटनेमुळे जिल्हाभरात संतापाची लाट उसळली आहे. भाईगिरीच्या नशेत बुडालेल्या आरोपींनी चाकू-कुकरीसारख्या धारदार हत्याराने यशचा जीव घेतला. माणुसकी विसरून केलेल्या या निर्दयी कृत्यामुळे समाजमन व्यथित झाले आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सिसिटिव्ही फुटेज आणि सुरुवातीच्या पोलिस अहवालात स्पष्ट विरोधाभास दिसून आला आहे. फुटेजमध्ये अनेक लोक घटनास्थळी उभे असल्याचे दिसत असताना, मात्र पोलिसांच्या अहवालात केवळ एका आरोपीचीच नोंद करण्यात आली आहे. यामुळे या प्रकरणात काहींना लपविण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, असा संशय अधिक गडद होत आहे. या घटनेची सखोल चौकशी करून सीसीटीव्ही कॉल-डिटेल्स व सर्व साक्ष्यांचा तपास व्हावा आणि दोषींवर कठोर, पारदर्शक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी हे पीडित कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, तसेच राज्याचे पोलीस महासंचालक आणि छत्रपती संभाजीनगरचे पोलीस महानिरीक्षक यांनी याची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे.

दरम्यान, समाजातील नागरिकांनी शांततेने व संयमाने वागावे, पण न्यायासाठी आवाज उठवायला मागे राहू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. पालकांना आपल्या मुलांच्या मित्रपरिवारावर, वागणुकीवर व व्यसनांच्या प्रवृत्तीवर लक्ष ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. यश ढाका हा अनुसूचित जातीतील वाल्मिकी समाजाचा होता. त्यामुळे या प्रकरणाने दलित समाजात मोठा संताप निर्माण केला आहे. बीडमधील सर्व आंबेडकरी चळवळीतील नेते व कार्यकर्ते कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहेत. यश ढाकाला न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# आज बीडमध्ये सुजात आंबेडकर ढाका कुटुंबियांची भेट घेणार

बीड (प्रतिनिधी)- शहरातील गजबजलेल्या माने कॉम्प्लेक्स परिसरात यश देवेंद्र ढाका (२२, रा. पेठबीड) या तरुणाचा गुरुवारी रात्री साडेआठ वाजता चाकूने खून करण्यात आला. या घटनेत मुख्य आरोपी सूरज काटे याला अटक करण्यात आली असली तरी त्याचे चार ते पाच साथीदार अद्याप मोकाट आहेत.



या पार्श्वभूमीवर संतप्त नातेवाइक व नागरिकांनी शुक्रवारी (दि. २६) दुपारी जिल्हा रुग्णालयासमोरील सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर भर पावसात ठिय्या देत रास्ता रोको केला. तब्बल तासभर झालेल्या या आंदोलनामुळे वाहतूक ठप्प झाली होती. 'मुर्दाबाद'च्या घोषणा देत जमावाने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मृत तरुण सामान्य कुटुंबातील असल्यानेच पोलिस दखल घेत नाहीत, असा थेट आरोपही आंदोलनादरम्यान करण्यात आला.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी मा. सुजात दादा आंबेडकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती दिली. त्यानंतर ढाका कुटुंबीयांना धीर देण्यासाठी मा. सुजात आंबेडकर हे आज (दि. २९) दुपारी १२ वाजता त्यांच्या घरी येणार आहेत त्यांच्यासोबत सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे प्रशांत बोराडे उपस्थित राहणार आहेत.

# ई-केवायसीने वाढली लाडकीची डोकेदुखी

मुंबई : लाडक्या बहिणींच्या अडचणी काही संपेना, सरकारच्या नव्या नियमांमुळे डोकेदुखी वाढली आहे. लाभार्थी महिलांना ईकेवायसी बंधनकारक केल्यामुळे योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील महिला दूरदूरहून सायबर केंद्रांवर येत आहेत. रांगा लावूनही तांत्रिक अडचणींमुळे त्यांना निराश होऊन घरी परतावे लागत आहे. यामुळे लाभार्थी महिलांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



राज्य सरकारने ऐन विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरु केलेल्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र आता यामुळे अनेक महिला लाभार्थींना मोठ्या तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ई-केवायसीसाठी आवश्यक असलेली वेबसाईट व्यवस्थित चालत नसल्याने ग्रामीण भागातील महिलांना वारंवार सायबर कॅफेवर चकरा माराव्या लागत आहेत. ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे. या तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी महिलांना अनेक तास सायबर कॅफेमध्ये वाट पाहावी लागत आहे. लाडकी बहीण योजनेची वेबसाईट वारंवार हँग होणे, त्याचे सर्वर डाऊन असणे या अशा समस्यांमुळे त्यांची नोंदणी पूर्ण होत नाही. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील महिला दूरदूरहून केंद्रांवर येतात. पण रांगा लावूनही तांत्रिक अडचणींमुळे त्यांना निराश होऊन घरी परतावे लागत आहे. या त्रासातून मुक्तता मिळावी, अशी अपेक्षा महिलांनी व्यक्त केली आहे. त्यासोबतच वेबसाईट तात्काळ सुरळीत करावी, अशी मागणीही केली जात आहे.

बोगस अर्ज रोखण्यासाठी ई-केवायसी बंधनकारक

राज्य सरकारने योजनेतील बोगस लाभार्थ्यांचे अर्ज मोठ्या प्रमाणात आढळून आले होते. त्यामुळे ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली होती. या प्रक्रियेमुळे लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची अचूक छाननी करण्यात येत होती.



## तालखेड प्रतिनिधी पदी नियुक्ती

सायं दैनिक महाराष्ट्र आरंभच्या तालखेड प्रतिनिधी म्हणून प्रकाश शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. सर्व वाचक आणि हितचिंतकांनी याची नोंद घ्यावी.

## संपादकीय...

### महिलांची सक्तीनं नसबंदी; ६० वर्षांनी माफी! ग्रीनलँडमध्ये ४५०० महिलांसोबत काय घडलेलं?

सुमारे ६० वर्षांपूर्वीची गोष्ट. स्थळ डेन्मार्क. मानवतेला काळिमा फासणारी एक घटना त्यावेळी घडली होती. ग्रीनलँडमधील हजारो महिलांची त्यावेळी बळजबरी 'नसबंदी' करण्यात आली होती. त्यांना जबरदस्तीनं गर्भनिरोधक साधनं बसवण्यात आली होती. यातल्या काही तर केवळ बारा वर्षांच्या मुली होत्या ! बहुसंख्य महिलांना नंतर प्रचंड वेदना आणि रक्तस्त्राव झाला होता. काही महिला यामुळे आयुष्यात कधीच माता बनू शकल्या नाहीत..

या घटनेच्या 'बळी' ठरलेल्या, आता वृद्ध झालेल्या काही महिलांनी सांगितलं, गर्भनिरोधक साधनं बसवण्यासाठी आमच्यावर जबरदस्ती तर झालीच, पण ही साधनं बसवताना कुठली काळजीही घेण्यात आली नाही. आम्हाला प्रचंड वेदना होत होत्या. रक्तस्त्राव होत होता. तक्रार केल्यावर डॉक्टरांनी मदत, उपचारही केले नाहीत. कमालीच्या वेदना होत असल्यानं काही महिलांनी स्वत:च ही साधनं काढण्याचा प्रयत्न केला, पण त्यामुळे त्यांच्या वेदनांत आणखीच वाढ झाली आणि आरोग्याच्याही अनेक समस्यांना त्यांना सामोरं जावं लागलं. या नसबंदीचा उद्देश ग्रीनलँडची लोकसंख्या नियंत्रित करणं हा होता, ज्याला आता वांशिक भेदभावाचं प्रतीक मानलं जातं.

डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांनी ६० वर्षांपूर्वीच्या याच घटनेबद्दल ग्रीनलँडची राजधानी न्यूक येथे नुकतीच महिलांची बिनशर्त माफी मागितली. त्यावेळी जवळपास ४५०० महिलांना जबरदस्तीनं गर्भनिरोधकं बसवण्यात आली होती. 'स्पायरल केस' या नावानंही ही घटना ओळखली जाते. ही घटना दुर्दैवी होतीच, पण ग्रीनलँडमध्ये झालेल्या या घटनेबद्दल डेन्मार्कच्या पंतप्रधानांनी का माफी मागावी?

कारण तेव्हा ग्रीनलँड हा डेन्मार्कचाच भाग होता. नंतर टप्प्याटप्प्यानं त्यांना काही अधिकार दिले गेले. अर्थात, आज ग्रीनलँडचा स्वतंत्र पंतप्रधान असला, तरी ग्रीनलँड अजूनही स्वतंत्र राष्ट्र नाही, मात्र आता ते बऱ्याच प्रमाणात स्वायत्त आहे.

डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन म्हणाल्या, ग्रीनलँडच्या महिलांना आज मला एकच गोष्ट सांगायची आहे, ती म्हणजे माफी! ग्रीनलँडच्या रहिवासी असल्यामुळे तुमच्यावर जो अन्याय झाला, तुमच्याकडून जे हिरावून घेण्यात आलं आणि त्यामुळे तुम्हाला जो त्रास, मनस्ताप सहन करावा लागला, त्यासाठी डेन्मार्कच्या वतीनं मी मनापासून माफी मागते!

याप्रसंगी ग्रीनलँडचे पंतप्रधान जेन्स-फ्रेडरिक नील्सन महिलांना उद्देशून म्हणाले, तुम्हाला काहीही विचारलं गेलं नाही. तुम्हाला बोलायची आणि ऐकून घ्यायचीही संधी दिली गेली नाही. आमच्या इतिहासातला हा सगळ्यात काळा अध्याय आहे.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या एका महिलेनं म्हटलं की, डेन्मार्कच्या पंतप्रधान फ्रेडरिक्सन यांनी माफी मागितली ही चांगली गोष्ट आहे, पण आम्हाला सत्य आणि न्याय हवा आहे. या भाषणात नुकसानभरपाईचा साधा उल्लेखही नसल्यामुळे आम्ही अतिशय निराश आहोत. डेन्मार्कच्या पंतप्रधानांनी पीडित महिलांसाठी एक 'नुकसानभरपाई फंड' उभा करणार असल्याचं म्हटलं, पण हा निधी कधी, किती महिलांना मिळेल हे अजून स्पष्ट नाही. १४३ महिलांच्या एका गटानं मात्र ५० कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईसाठी खटला दाखल केला आहे.

सुमारे ६० वर्षांपूर्वीची गोष्ट. स्थळ डेन्मार्क. मानवतेला काळिमा फासणारी एक घटना त्यावेळी घडली होती. ग्रीनलँडमधील हजारो महिलांची त्यावेळी बळजबरी 'नसबंदी' करण्यात आली होती. त्यांना जबरदस्तीनं गर्भनिरोधक साधनं बसवण्यात आली होती. यातल्या काही तर केवळ बारा वर्षांच्या मुली होत्या ! बहुसंख्य महिलांना नंतर प्रचंड वेदना आणि रक्तस्त्राव झाला होता. काही महिला यामुळे आयुष्यात कधीच माता बनू शकल्या नाहीत..

या घटनेच्या 'बळी' ठरलेल्या, आता वृद्ध झालेल्या काही महिलांनी सांगितलं, गर्भनिरोधक साधनं बसवण्यासाठी आमच्यावर जबरदस्ती तर झालीच, पण ही साधनं बसवताना कुठली काळजीही घेण्यात आली नाही. आम्हाला प्रचंड वेदना होत होत्या. रक्तस्त्राव होत होता. तक्रार केल्यावर डॉक्टरांनी मदत, उपचारही केले नाहीत. कमालीच्या वेदना होत असल्यानं काही महिलांनी स्वत:च ही साधनं काढण्याचा प्रयत्न केला, पण त्यामुळे त्यांच्या वेदनांत आणखीच वाढ झाली आणि आरोग्याच्याही अनेक समस्यांना त्यांना सामोरं जावं लागलं. या नसबंदीचा उद्देश ग्रीनलँडची लोकसंख्या नियंत्रित करणं हा होता, ज्याला आता वांशिक भेदभावाचं प्रतीक मानलं जातं.

डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांनी ६० वर्षांपूर्वीच्या याच घटनेबद्दल ग्रीनलँडची राजधानी न्यूक येथे नुकतीच महिलांची बिनशर्त माफी मागितली. त्यावेळी जवळपास ४५०० महिलांना जबरदस्तीनं गर्भनिरोधकं बसवण्यात आली होती. 'स्पायरल केस' या नावानंही ही घटना ओळखली जाते. ही घटना दुर्दैवी होतीच, पण ग्रीनलँडमध्ये झालेल्या या घटनेबद्दल डेन्मार्कच्या पंतप्रधानांनी का माफी मागावी?

कारण तेव्हा ग्रीनलँड हा डेन्मार्कचाच भाग होता. नंतर टप्प्याटप्प्यानं त्यांना काही अधिकार दिले गेले. अर्थात, आज ग्रीनलँडचा स्वतंत्र पंतप्रधान असला, तरी ग्रीनलँड अजूनही स्वतंत्र राष्ट्र नाही, मात्र आता ते बऱ्याच प्रमाणात स्वायत्त आहे.

डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन म्हणाल्या, ग्रीनलँडच्या महिलांना आज मला एकच गोष्ट सांगायची आहे, ती म्हणजे माफी! ग्रीनलँडच्या रहिवासी असल्यामुळे तुमच्यावर जो अन्याय झाला.

# नुकसानीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी एक लाख भरपाई दया– शेख खिजर

तलवाडा (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिदृष्टी मुळे खरीपात तील पिकाचे मोठे नुकसान झाले आहे दरम्यान रविवारी व सोमवार रात्री झालेल्याअतिदृष्टी मुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे तरी शासनाने वला दुष्काळ जाहिर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयाची मदत द्यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उप अध्यक्ष शेख खिजर व जयदेव शिगणे यांनी जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात




म्हटले आहे त्यांनी पुढे निवेदनात म्हटले आहे की, शेजारील राज्य पंजाब ने शेतकरी ना हेक्टरी ५०,००० रुपये दिले त्या धर्तीवर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये देण्यात यावे सर्व पिके गेल्या मुळे कर्ज मुक्ती देण्यात यावे अन्यथा बीड जिल्ह्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटना महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांना काळे झेंडे दाखवल्या शिवाय राहणार नाही असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शेख खिजर, राजू गायके, दिनकर रिंगणे, विलास खिसाडे, जयदेव शिगणे यांनी केले आहे

# पावसाने गावे खरडली, नेत्यांची धुंदी कधी उतरेल?

## निदान पंधरा दिवस राजकारणाला फुलस्टॉप द्या



बिहारमध्ये विधानसभेची निवडणूक जाहीर झालेली नाही, पण राजकारण पेटले आहे. आपल्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक जाहीर होण्याआधीच एकमेकांची उणीदुणी काढणे सुरू झाले आहे. अख्खा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राचा मोठा भाग पावसाने खरडून काढलेला असतानाही या ओल्या दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी राजकारण बाजूला ठेवून सामान्य माणसाच्या मदतीला आपण एकत्र येऊ, असे शहाणपण कोणालाही आलेले दिसत नाही.

पंधरा दिवस राजकारणाला फुलस्टॉप द्या, पावसाच्या रौद्र रूपाने पुरते हालहाल केलेल्यांचे अश्रू पुसण्यासाठी एकोप्याचे दर्शन घडवा, पण ते घडेल कसे? लगेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत, प्रत्येक पक्षाला त्यासाठी मैदान तयार करायचे आहे. गेली काही वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणाला सूज आली आहे. संवेदना बधिर झाल्या आहेत. पावसाच्या बेधुंदीने अनेक संसार उद्ध्वस्त झाले असताना, निवडणुकीची नांदी अन् त्यातून राजकारणाची धुंदी यातच नेते अडकले आहेत.

गोपीचंद पडळकर वाट्टेल तसे बरळले, त्यांच्या निषेधाच्या सभेत त्यांचे विरोधक बरळले. वाचाळविरांची अशी फिट्टमफाट सुरू आहे. राजकारण्यांची एक पिढीच स्वैर झाली आहे. नैसर्गिक वा इतर कोणतीही आपत्ती राज्यावर ओढवली, तरी ही पिढी आपत्तीच्या मुकाबल्यासाठी एकसंध होऊन काम करेल, अशी अपेक्षा करणेसुद्धा व्यर्थ आहे. यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब भारदे, रामभाऊ म्हाळगी, एस. एम. जोशींच्या महाराष्ट्राला वैचारिक दृष्ट लागली आहे.

निवडणूक, मोठे उत्सव म्हटले की, काही गुंडांना पोलिस जिल्हाबंदी करतात, त्याला तडीपारीही म्हणतात. काही दिवसांपुरती काही राजकारण्यांची तडीपारीही जरुरीची वाटावी, असे एकूण चित्र आहे.

केंद्राकडून मदत हवीच !

सर्वपक्षीय नेते पूरग्रस्तांच्या वेदना समजून घेण्यासाठी बांधावर पोहोचत आहेत. चांगलेच आहे. सत्ताधाऱ्यांना बऱ्याच ठिकाणी आक्रोशाचा सामना करावा लागत आहे. सरकार, प्रशासन आणि जनता यांच्यातील संवादाची कमतरता हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. या आपत्तीच्या निमित्ताने फक्त ते समोर आले आहे एवढेच. सर्वस्व गमावलेल्यांना भक्कम आर्थिक आणि मानसिक आधाराची गरज आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार हे या ना त्या कारणाने मोदी सरकार, अमित शाह यांचे लाडके आहेत. 'महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले' हे खरेच; पण आज महाराष्ट्राचा गाडा अडला असून, त्याला केंद्राच्या तातडीच्या आर्थिक मदतीची गरज आहे.

जीएसटीचे दर कमी झाल्याने जीएसटीतून महाराष्ट्राला मिळणारा वाटा लगेच कमी होणार आहे, भविष्यात तो कदाचित वाढेलही, पण त्याचे दृष्य परिणाम जानेवारीपासून दिसतील. 'लाडकी बहीण' योजनेच्या आर्थिक बोज्याने विकासकामांना आधीच फटका बसला आहे. अशावेळी केंद्र सरकार राज्याच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे सिद्ध करायचे असेल, तर हीच ती वेळ आहे. कॉर्पोरेट कंपन्या, मोठी औद्योगिक घराणी यांनीही पूरग्रस्तांसाठी आपला हात मोकळा करण्याची गरज आहे. पंजाबमध्ये महापूर आला, तेव्हा जगभरातील पंजाबी समाजाने भरभरून मदत पाठविली. जगभरातील मराठी माणूस मराठवाडा, सोलापूर, वाशिमसाठी धावून येण्याची गरज आहे. पूरग्रस्त भागासाठी राज्य सरकारने विशेष पॅकेज दिले पाहिजे, मुख्यमंत्री फडणवीस ते लवकरच देतील, अशी अपेक्षा आहे. सरकारच्या संवेदनशीलतेची ही परीक्षा आहे.

दूरचे पालक काय कामाचे?

आपण सांगतो की 'ते माझे दूरचे काका लागतात; आमचा त्यांचा फार काही संबंध नाही, लग्नकार्यात भेट होते एवढेच...' तसे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या दूरचे पालकमंत्री आहेत. त्यांचा ते पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यांशी काहीएक संबंध नसतो. अतिवृष्टीमध्ये त्याचा अनुभव आला. बहुतेक 'दूरचे' पालकमंत्री तीन दिवस जिल्ह्यात पोहोचलेच नव्हते. माध्यमांनी बोंब केली, विरोधकांनी तक्रार केली, तेव्हा कुठे लाजेखातर पोहोचले. जिल्ह्यातल्याच मंत्र्याला पालकमंत्री केले, तर तिथे सत्तापक्षातच संघर्ष उभा राहतो, म्हणून बाहेरचे मंत्री नेमण्याची पद्धत सुरू झाली.

हे बाहेरचे मंत्री जिल्ह्यात फिरकतच नसतील, तर काय कामाचे? विमानतळ नसलेल्या जिल्ह्यात तर पालकमंत्र्यांना पोहोचण्याची अडचण आहे ना हो! अलिशान गाडी असली, तरी एवढ्या दूर कोण जाईल? त्या जिल्ह्याच्या मंत्र्यांना त्याच जिल्ह्याचे पालकमंत्री करा. एखाद्या जिल्ह्यात मंत्री नसेल, तर बाजूच्या जिल्ह्यातल्या मंत्र्याला पालकमंत्रीपद द्या, पण साताऱ्याचे मकरंद पाटील बुलडाण्याचे, तर ठाण्याचे प्रताप सरनाईक धाराशिवचे पालकमंत्री, असे प्रयोग थांबवा.

जाता-जाता मृद व जलसंधारण महामंडळातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची तीन दिवसांपूर्वी बदली झाली. हा अधिकारी भयंकर घोटाळे करतो, तरीही त्याला कोणी धक्का लावू शकत नाही, असे म्हटले जायचे. त्याच्या 'कर्तृत्वाच्या' सुरस कथांची जोरदार चर्चा असायची. आता त्याची बदली झाली, पण ही कारवाई कशी म्हणायची? बदलीने आधीची पापे धुतली गेली. अनेक अधिकाऱ्यांबाबत असेच घडते. ही एक वेगळीच अभय योजना आहे. अनेकांची पापे निवृत्तीने धुतली जातात. ज्यांचा यावर 'विश्वास' बसत नसेल, त्यांच्यासाठी एवढेच की, अशांना निवृत्तीनंतर सारस्वतांच्या संमेलनाचे अध्यक्षपदही मिळते. अशाने भ्रष्टाचाराचे 'पानीपत' कसे होणार?

गोपीचंद पडळकर वाट्टेल तसे बरळले, त्यांच्या निषेधाच्या सभेत त्यांचे विरोधक बरळले. वाचाळविरांची अशी फिट्टमफाट सुरू आहे. राजकारण्यांची एक पिढीच स्वैर झाली आहे. नैसर्गिक वा इतर कोणतीही आपत्ती राज्यावर ओढवली, तरी ही पिढी आपत्तीच्या मुकाबल्यासाठी एकसंध होऊन काम करेल, अशी अपेक्षा करणेसुद्धा व्यर्थ आहे. यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब भारदे, रामभाऊ म्हाळगी, एस. एम. जोशींच्या महाराष्ट्राला वैचारिक दृष्ट लागली आहे. निवडणूक, मोठे उत्सव म्हटले की, काही गुंडांना पोलिस जिल्हाबंदी करतात, त्याला तडीपारीही म्हणतात. काही दिवसांपुरती काही राजकारण्यांची तडीपारीही जरुरीची वाटावी, असे एकूण चित्र आहे. केंद्राकडून मदत हवीच ! सर्वपक्षीय नेते पूरग्रस्तांच्या वेदना समजून घेण्यासाठी बांधावर पोहोचत आहेत. चांगलेच आहे. सत्ताधाऱ्यांना बऱ्याच ठिकाणी आक्रोशाचा सामना करावा लागत आहे. सरकार, प्रशासन आणि जनता यांच्यातील संवादाची कमतरता हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. या आपत्तीच्या निमित्ताने फक्त ते समोर आले आहे एवढेच. सर्वस्व गमावलेल्यांना भक्कम आर्थिक आणि मानसिक आधाराची गरज आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार हे या ना त्या कारणाने मोदी सरकार, अमित शाह यांचे लाडके आहेत

पान ४ वरून..

**यश ढाका याच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करा**

यश बाम्ब या युवकाचे नाव प्रमुख आरोपी म्हणून समोर आले आहे. या घटनेने समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आरोपीसह त्याच्या टोळीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. पत्रकार संघटनेचे म्हणणे आहे की, वारंवार गुन्हेगारी प्रवृत्तीची प्रकरणे घडत असतानाही दोषींवर कडक कारवाई होत नाही. यामुळे तरुणाई दिशाभूल होऊन गुन्हेगारीकडे वळत आहे. त्यामुळे मुख्य आरोपीसह इतर आरोपींना तात्काळ अटक करून कायद्यानुसार योग्य ती शिक्षा व्हावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदनावर माजलगाव तालुक्यातील विविध पत्रकारांनी सह्या केल्या असून, या मागणीची दखल घेऊन प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

--------------------

**संत महंतांच्या मंगलमय उपस्थितीत बाजीराव पेट्रोलियमचे आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते थाटात उद्घाटन**

पेट्रोल यांचे प्रोप्रायटर माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी. हरिहर धर्माधिकारी. एडवोकेट प्रताप धर्माधिकारी. यांनी केला.

दरम्यान. गेल्या दोन दिवसापासून परळी व परिसरात मुसळधार पाऊस सुरू आहे. आज ई सकाळपासून मोठा पाऊस सुरू होता. मात्र या नव्या सेवा व्यवसायाच्या शुभारंभ सोहळ्याला भर पावसातही परळी व परिसरातील नागरिकांना मोठ्या संख्येने शुभेच्छा देत धर्माधिकारी परिवाराला प्रेम व्यक्त केले त्यांच्याबरोबर संपूर्ण दिवसभर या नव्या व्यवसायाला शुभेच्छा देण्यासाठी सर्व स्तरातील नागरिकांची बाजीराव पेट्रोलियम वर रिग लागली होती भर पावसात ही स्नेही हितचिंतकांनी आवर्जून उपस्थित राहून भेट देऊन. सदिच्छा व शुभेच्छा व्यक्त केल्या. एक प्रकारे भर पावसातही परळीकरांचे धर्माधिकारी परिवारावरील प्रेम या निमित्ताने ओसडून वाहिल्याचे चित्र बघायला मिळाले.

--------------------

**गेवराई तालुक्यातील गोदाकाठी गावात पाण्याचा वेडा**

त्यामुळे आकडा वाढण्याची शक्यता आहे तर काठचिंचोली येथील १३० नागरीक हलवण्यात आले आहे या सर्वांना गेवराई तालुक्यात पुन्हा मदतीचा हाथ म्हणुन शारदा प्रतिष्ठान ची टीम सेवा पुरवत असुन या ठिकाणी पाहणी करण्या साठी तहसीलदार संदीप खोमणे,गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप, विस्तार अधिकारी उनवणे, मंडळ अधिकारी बाबा बडे, तलाठी जावेद शेख, आदींनी भेटी दिल्या असुन नागरिकांची विचारपुस करण्यात आली

डॉ. खरवडे डॉ,काकड व त्यांच्या टीम चे कार्य कौतुकास्पद

तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ खरवडे यांच्या टीम ने दिवस रात्र एक करत कटचिंचोली येथील काही महिला प्रसुती साठी तलवाडा येथे अन्या साठी मोठ्या समस्या वर मात करत कसलाही विचार न करता म्ब्युलन्स तून पाऊस सुरू असताना पाण्या तून म्बुलन्स ड्रायव्हर एकनाथ नाटकर यांनी सुख रूप पोहोच केले व वैद्यकीय अधिकारी डॉक्टर खरवडे यांनी लक्ष घालून एकही पेशंट रेफर केला नाही त्यामुळे त्याचे अभिमान स्पद कामगिरी करण्यात आली आहे

--------------------

**ओला दुष्काळ जाहीर करून ५० हजारांची मदत द्या : उपसरपंच बापू सावंत पुसरा**

तालुक्यात खरीप पिके कांहीच शिल्लक राहीले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने

आता कुठलेही पंचनामे अथवा इतर कुठलेही नियम अटी न लावता वडवणी तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून, तालुक्यातील गायरान धारकासह सर्वच शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रू. मदत तात्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करावी. अशी मागणी उपसरपंच बापू सावंत यांनी केली आहे.

----------------

**रेल्वे पुलाखालील पाणी काढुन दिले**

पूलाखाली पाऊस पडला की पाच फूट इतक्या उंचीचे पाणी साचते त्यामुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प होते, परिणामी डोंगरपट्टीतील जनतेचा संपर्क तुटतो, पाण्याचा निचरा करून द्या, पाणी नदीपात्रात सोडा याकरिता शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे यांनीअर्ध नग्न आंदोलन केले होते, परत आज अतिवृष्टी झाली, मोठा पाऊस पडल्याने तीच परिस्थिती निर्माण

------------------

**आईचे स्वप्न झाले पूर्ण – यश मुळे यांची MBBS मध्ये निवड**

कायम उंचावलेला होता. त्याच्या जिद्दीची दखल घेत शिक्षकांनी त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले. ग्रामस्थांनीही अभिमान व्यक्त करताना सांगितले की, आईच्या जाण्यानंतरही यशने धैर्य दाखवत परिस्थितीला सामोरे गेले. हे यश केवळ त्याचेच नाही, तर संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब आहे. प्रेरणादायी उदाहरण

धामणगावसह संपूर्ण परिसरात या यशाबद्दल आनंदाचे वातावरण आहे. यशची जिद्द व चिकाटी आज अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून तो समाजसेवेसाठी पुढाकार घेईल आणि आईचे स्वप्न प्रत्यक्षात आणेल, असा ठाम विश्वास ग्रामस्थ, शिक्षक व नातेवाईकांनी व्यक्त केला आहे.

------------------

# श्रृंगऋषीगड दसरा मेळाव्याला बीड जिल्ह्यातील सर्व धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ,गणेश कोळेकर ,लक्ष्मण मस्के,

बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्हा हा भावीक भक्तांचा साधु संतांचा व गड तिर्थक्षेत्रांचा म्हणून ओळखला जातो. ह्वगेली कित्येक वर्षानुवर्षे बीड जिल्ह्यात दोन ठिकाणी दसरा मेळावे आयोजित होत होते. ह्वजिल्ह्यातील सर्वच भाविक हे या दोन्ही ठिकाणी जात होते. रंतु गेल्या वर्षा पासून शिरूर तालुक्यातील शिंगरवाडी श्रृंगऋषीगड येथे पण दसरा मेळाव्याचे आयोजन ह.भ.प.सुरेशानंद महाराज यांच्या वतीने आयोजित करण्यात येत आहे.ेल्या वर्षी प्रथमदर्शी मेळावा आयोजित केला होता.तर या मेळाव्याला बीडसह राज्यात अनेक दिग्गजांनी आवर्जून उपस्थिती लावली होती. एक हजार समाज बांधवां उपस्थित राहीला होता. ा वर्षी पण राज्यातील प्रमूख सामाजिक मार्गदर्शक आवर्जून उपस्थित राहणार आहेत. ह्वत्यामुळे बीड जिल्ह्यात दोन नाही तर तिनं ठिकाणी दसरा मेळावे होणार असल्याने. ह्वआपण आपल्या सामाजिक एकोपाची दिशा भक्कम करण्यासाठी श्रृंगऋषीगड हेच एकमेव ठिकाण दसरा मेळाव्याला आसल्याने तमाम धनगर समाज बांधवांनी होणाऱ्या या दसरा मेळाव्याला आवर्जून बहुसंख्येने उपस्थित राहावे. ह्वअसे भावनीक आवाहन सामाजिक कार्यकर्ते गणेश पाटील कोळेकर व





लक्ष्मण मस्के यांनी केले आहे.ुढे मत व्यक्त करतांना त्यांनी म्हटले आहे की. ह्वतुझं आहे तुझ्या पाशी.तु वाट चुकलाशी.अशा द्वविदल भुमीकेत समाज बांधवांनी आपली ईतर ठिकाणी वाट न चुकता आपल्या श्रृंगऋषीगड येथेच दसरा मेळाव्याला यावे. ह्व.समाज बांधव कसा एका छताखाली येईल.हा सामाजिक सलोखा निर्माण केला पाहिजे. तर आता संघटीतपणे येण्याची गरज आहे. आणि ते दसरा मेळाव्याच्या माध्यमातुन शक्य आहे. र्वच लोक हे दसरा मेळाव्याच्या माध्यमातुन एक विचारशक्ती निर्माण करत आहेत. परंतु धनगर बांधवांना कधीच विचारात घेत नाहीत. मग जिथे आयुष्यभर गेलोत.तिथे किंमत होत नसेल तर जायचे कशाला. या संदर्भात एक स्वतंत्र हक्कांचा धनगर समाज एकोपा दसरा मेळावा जिथे आयोजित होत आहे. अशा ठिकाणीच समाज बांधवांनी यावे असे दिलेल्या पत्रकात मस्के व कोळेकर यांनी म्हटले आहे.

## भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्यासाठी लाखोच्या संख्येने उपस्थित रहा - हरिभाऊ सांगळे

दौलावडगाव (प्रतिनिधी):- दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भगवान भक्तीगड सावरगाव घाट येथे दसरा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे दसरा मेळाव्याला संबोधित करण्यासाठी नामदार पंकजाताई मुंडे व आमदार धनंजय मुंडे उपस्थित राहणार असून लाखोच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आव्हान जय भगवान महासंघ आष्टी तालुका अध्यक्ष हरिभाऊ सांगळे यांनी केले आहे.



दसरा मेळाव्यातून विचाराचा सोनं लुटण्यासाठी लाखोंचा जनसमुदाय भगवान भक्ती गड सावरगाव येथे जमत असतो याही वर्षी मोठ्या उत्साहात हा दसरा मेळावा संपन्न होणार असून आमदार पंकजा मुंडे व आमदार धनंजय मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे तसेच विचाराचे सोने लुटून ताई साहेबांचे व धनंजय मुंडे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान जय भगवान महासंघाचे आष्टी तालुका अध्यक्ष हरिभाऊ सांगळे यांनी केले आहे...

## धानोरा रोडच्या होणाऱ्या कामाचे श्रेय फक्त जनतेलाच-बीड शहर बचाव मंच

### कोणत्याही प्रस्थापित श्रेय लाट्या दिवट्यांनी श्रेय लाटू नये बीड शहर बचाव मंचाने ठणकावले

बीड (प्रतिनिधि):- धानोरा रोडच्या सुरू होणाऱ्या कामाचे श्रेय फक्त सातत्याने आंदोलने करणाऱ्या स्थानिक जनतेच्या प्रयत्नांनाच आहे. कोणत्याही प्रस्थापित घराणेबाज श्रेय लाट्या दिवट्यांनी याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये असे बीड शहर बचाव मंच सर्व प्रस्थापित दिवट्यांना ठणकावत आहे. धानोरा रोडची स्थानिक जनता तसेच या रोडवर असणाऱ्या नऊ शाळेंमधील विद्यार्थी व त्यांचे पालक, या शाळेंमध्ये कार्यरत असलेले सर्व कर्मचारी अध्यापक व शिक्षक वर्ग, विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी सर्व वाहनधारक, वाहन चालक मंडळी, धानोरा रोडशी जोडलेली सर्व छोटी गावखेडी, या गावांमधून बीड शहराला दूध आणि भाजीपाला पुरवठा करणारे सर्व शेतकरी अशी सर्वच जनता गेल्या वीस वर्षापासून भीषण हाल अपेष्टा या धानोरा रोडच्या दुर्दशेमुळे सहन करत आलेली आहे तसेच या रोडच्या विकासाच्या कामासाठी आंदोलने करत आलेली आहे. स्थानिक जनता गेल्या २० वर्षापासून सतत या रोडच्या विकास कामांसाठी संघर्ष करत आहे. या सर्व स्थानिक जनतेने वेळोवेळी या रस्त्याच्या विकासासाठी मोठी आंदोलने केली आहेत. स्थानिक जनतेने अनेक वेळा या रोडच्या विकासासाठी निवेदने दिली आहेत. या सर्व गतकाळामध्ये ही सर्व प्रस्थापित घराने बाज 'श्रेय लाटू दिवटे कमिटी' आणि श्रेय लाटू लोकप्रतिनिधी दिवटे मंडळी कुठे होती..??



ही सर्व दिवटे मंडळी विकासाचे दिवे नेमके कुठ लावत बसलेली होती ? ज्या प्रकारे धानोरा रोडची दुर्दशा झाली आहे तशीच दुर्दशा सर्व शहराची आज झालेली आहे. या प्रस्थापित दिवट्यांनी काही कामे गुत्तेदार म्हणून जरी केलेली असतील तरी त्याचेही तीन तेरा नऊ बारा वाजलेले आहेत. बीड शहरात अतिशय निकृष्ट दर्जाची बोगस कामे या लोकांनी केलेली आहेत. यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये आपण बीड शहराचे चाललेले हाल पाहत आहोत. धांडे नगर, स्वराज्य नगर भागामध्ये नागरिक काय मरणांतक हाल अपेष्टा सहन करीत आहेत हे आपण सर्वजण रोज पहात आहोत. शहराच्या या झालेल्या दुर्दशेचे श्रेय याच सर्व प्रस्थापित दिवटे कमिटीला जाते. जसे एखाद्या रस्त्याचा निधी मंजूर झाल्यानंतर श्रेय लाटण्यासाठी हे सर्वजण पुढे येतात तसेच शहरातील झालेल्या दुर्दशेची जबाबदारी घेण्यासाठी या सर्वांनी पुढे येऊन त्याचेही श्रेय घेतलेच पाहिजे. धानोरा रोड साठी यापूर्वीही मंजूर झालेले निधी कुठे कुठे वापरण्यात आले आहेत..? त्याचे काय केले हेही जनतेला समोर येऊन सांगावे. धानोरा रोडचा विकास जाणीवपूर्वक का प्रलंबित ठेवला याचीही कारणे जनतेपुढे येऊन द्यावीत. प्रस्थापित घराण्यांच्या प्रॉपर्टीज-इस्टेटस् ज्या ठिकाणी आहेत तिथे सिमेंट रोड,नाल्या रस्ते,दिवे, सर्व सुविधा आधी निर्माण केल्या जातात. मग दरवर्षी नगरपालिकेचा कर भरणाऱ्या जनतेला या सुविधा का मिळत नाहीत..?? तुमच्या तीन-तीन पिढ्या सत्ता भोगून राज्य करून जातात तरी जनतेच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न 'सुटतच' नाहीत हा कसला विकास आहे, ही विकासाची कुठली पद्धत आहे... ?? अटल अमृत जल योजना व भुयारी गटार योजना का कार्यान्वित होत नाहीत, या योजनांची सद्यस्थिती काय आहे आणि या स्थितीची जबाबदारी कोणाची, याचे श्रेय कोणाचे, यासंदर्भातील जनतेच्या प्रश्नांची सर्व प्रस्थापित दिवट्यांनी व प्रस्थापित लोकप्रतिनिधींनी समोर येऊन उत्तरे द्यावीत. इतर मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींचा बीड शहराच्या विकास कामांमध्ये शून्य सहभाग आहे. त्यांचे या बीड शहरांमध्ये कसलेही योगदान नाही. त्यांनी आपल्या मतदारसंघातील नगरपालिका चांगल्या सांभाळाव्यात तिथेही खूप मोठी दुर्दशा आहे. तिथल्या गैरकारभाराची भांडी फोड करण्याची वेळ आमच्यावर आणू नका. इतर मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींनी फक्त आपल्याच मतदारसंघातील नगरपालिका नीट सांभाळाव्यात.

## दिवाळी खरेदीचा खास अनुभव: तेजस्विनी ग्रुपचे भव्य प्रदर्शन!

### खरेदीचा आनंद सहकुटुंब घ्या - सोनल पाटील

बीड (प्रतिनिधी):- बीड़ येथे यंदाची दिवाळी अधिक खास आणि उत्साहाची होणार आहे. तेजस्विनी ग्रुप मार्फत ९ ऑक्टोबर आणि १० ऑक्टोबर तारखेला रामकृष्ण लॉन्स येथे महिला उद्योजकांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन आणि विक्री आयोजित करण्यात आले आहे. दिवाळीच्या सणानिमित्त खास खरेदीसाठी हे प्रदर्शन म्हणजे एक उत्तम संधी आहे. या प्रदर्शनात तुम्हाला दिवाळीसाठी आवश्यक असलेल्या विविध वस्तू, भेटवस्तू, खाद्यपदार्थ, कपडे, सजावटीचे साहित्य आणि बरेच काही एकाच छताखाली उपलब्ध होईल. महिला उद्योजिकांनी आपल्या कलेतून आणि मेहनतीने तयार केलेल्या या वस्तूंची खरेदी करून आपण त्यांना प्रोत्साहन देऊ शकता आणि त्यांचा आनंद द्विगुणित करू शकता. तेजस्विनी ग्रुपच्या वतीने सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, आपण सहकुटुंब, सहपरिवार, मित्र-मैत्रिणी, शेजारीपाजारी अशा सर्वांसह या प्रदर्शनाला नक्की भेट द्या. दिवाळीच्या खरेदीचा उत्तम अनुभव घ्या आणि महिला उद्योजकांच्या या प्रयत्नांना भरभरून प्रतिसाद द्या.



ठिकाण: रामकृष्ण लॉन्स

तारीख: ९ ऑक्टोबर आणि १० ऑक्टोबर तारखेला वेळ: सकाळी १० ते संध्याकाळी १० पर्यंत राहील.

लक्षात ठेवा आपल्या एका खरेदीमुळे एका छोट्या व्यावसायिकाच्या स्वप्नांना बळ मिळणार आहे. चला, तर मग या दिवाळीत महिला उद्योजकांना पाठिंबा देऊया असे आव्हान तेजस्विनी ग्रुप संस्थापक अध्यक्ष सोनल अरविंदसिंह पाटील यांनी केले आहे.

## लाडक्या बहिणींना दिवाळीला दोन हप्ते द्या

### माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करा - उपसरपंच अनिल राधे कांबळे


माजलगाव (प्रतिनिधी):- लाडक्या बहिणींना केवायसी केल्यानंतर हप्ता दिला जाईल असे शासन सांगत आहे परंतु दिवाळीला एकत्रित दोन हप्ते द्या व माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करून एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या अशी मागणी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी शासनाकडे केले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना ई केवायसी करा त्यानंतर लाभ मिळेल असे संकेत शासनाने दिले आहेत परंतु ऐन सणासुदीच्या काळात ई केवायसी चे फर्मान शासनाने काढल्याने अनेक पात्र लाभार्थी महिला वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने दिवाळीनंतर ई केवायसी अनिवार्य करावी व दिवाळीला एकत्रित दोन हफ्त्यांचा लाभ द्यावा तसेच मागील दोन दिवसांपासून अतिवृष्टी व ढगफुटी सारखा पाऊस शहरासह तालुक्यात बरसत आहे. खरीपातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे करण्यात वेळ न घालवता तात्काळ शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपयांची नुकसान भरपाई द्या अशी मागणीही उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी केली आहे.





बीड : बीड जिल्ह्यासह गेवराई तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकर्यांचे पूर्णपणे सर्व पिकाचे नुकसान झाले आहे त्यामुळे मराठवाड्या सह बीड जिल्हा गेवराई तालुक्यात ओला दुष्काळ जाहिर करुन नुकसान भरपाई देऊन सरसकट कर्ज माफी करण्यात यावी तसेच गायरान धारक, सिलिंग ,पोटखराब, अतिक्रमण धारक यांचेही पंचनामे करून अर्थिक मदत देण्यात यावी यासाठी लहुजी शक्ति सेनेच्या वतीने गेवराई तहसीलदार यांना निदवेदन देण्यात आले यावेळी लहुजी शक्ति सेना मराठवाड़ा युवक संघटक मा श्री विनोदभाऊ थोरात लहुजी शक्ति सेना शहराध्यक्ष तथा संपर्क प्रमुख आकाश थोरात युवा तालुकाध्यक्ष अजय कापसे लहूजी शक्ति सेना युवा नेते जितेंद्र सुतार साईनाथ कारके अर्जून आहेर सह गायरान धारक शेतकरी बांधव पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

## घाटनांदुर रेल्वे पुलाखालील पाणी साचल्यामुळे नागरिक त्रस्त



घाटनांदुर (प्रतिनिधी):- ता.अंबाजोगाई घाटनांदुर गावात पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात झाला असून अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर मंडळामध्ये ८४.३ ाा इतकी अतिवृष्टी पावसाची नोंद झाली आहे. रेल्वे पुलाखाली मात्र पाणी साचून रहदारीत अडथळा निर्माण झाला आहे.अनेक वर्षांपूर्वी झालेल्या रेल्वेच्या गलथान कारभारामुळे हा प्रश्न कायमस्वरूपी स्थानिक ग्रामस्थांची डोकेदुखी ठरला आहे.पावसाचे पाणी साचल्याने वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून,पायी जाणाऱ्या नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात या पुलाखाली पाणी साचते आणि त्यामुळे नागरिकांना हकनाक त्रास सहन करावा लागतो. चारचाकी, दुचाकी वाहने तर अडकून पडतातच, पण शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग, तसेच शेतकरी बांधवांनाही या समस्येमुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येऊनही प्रशासनाकडून याकडे गंभीरतेने पाहिले जात नसल्याचे दिसून येते. नागरिकांच्या मते, योग्य निचरा व्यवस्था नसल्यामुळे हा प्रश्न कायमस्वरूपी उभा राहिला आहे. नागरिकांची मागणी आहे की, संबंधित रेल्वे व स्थानिक प्रशासनाने तात्काळ पावले उचलून पुलाखालील पाणी साचण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा.अन्यथा दरवर्षी नागरिकांना या त्रासातून जावे लागणार आहे. प्रशासनाने त्वरित दखल घेऊन नागरिकांना या समस्येतून मुक्त करणे गरजेचे आहे,अशी मागणी घाटनांदुर स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने जोर धरू लागली आहे.

## मोमीन फैजान अब्दुल जुनैद बीएएमएस मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

बीड (प्रतिनिधी) - येथील नामवंत आदित्य आयुर्वेद कॉलेज एंड रिसर्च सेंटर चा विद्यार्थी मोमीन फैजान अब्दुल जुनैद याने नुकतेच जाहीर झालेल्या बीएएमएस च्या अंतिम वर्षात ६१.५४% गुण घेत प्रथम श्रेणीत यश मिळविले आहे.



मोमीन फैजान हा बीड शहरातील मुख्य डाकघरात कर्तव्यावर असलेले पोस्टल असिस्टंट मोमीन अब्दुल जुनैद यांचा मुलगा असून वडिलांनी मोठ्या मेहनतीने व कष्टाने आर्थिक भार उचलत मोमीन फैजान ला दिलेल्या शिक्षणाचे चीज केले आहे. फैजान ने बीएएमएस च्या अंतिम वर्षात ६१.५४% गुण घेऊन प्रथम श्रेणीत यश मिळविल्याने सेवानिवृत्त प्राचार्य नवीद सिद्दिकी, मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्यासह नातेवाईक, मित्र परिवाराने त्याचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त करत शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना निमित्त शहापूर मजरा येथे स्वच्छता मोहीम

### गावाला स्वच्छ सुंदर समृद्ध बनवण्याचा निर्धार


माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील शहापूर मजरा ग्रामपंचायत येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत स्वच्छते मोहिम सुरु मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत ग्रामपंचायत शहापूर मजरा याठिकाणी आठवड्यातील एक दिवस गावासाठी हा नवीन स्तुत्य उपक्रम हाती घेतला असून यात संत गाडगेबाबा व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेच व स्वच्छतेसाठी लागणाऱ्या वस्तू चे पूजन करून आज शुभारंभ करण्यात आला याला गावातील जेष्ठ नागरिक व तरुणाच्या मोठ्या संख्येने उपस्थित होती मोठया उत्साहात स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली यामध्ये जेष्ठांचे मार्गदर्शन व



तरुणांचे खूप मोठ्या प्रमाणात लाभले. सुरवातीला सर्वांनी मिळून सार्वजनिक स्वच्छता करण्यास सुरवात केली. तसेच गावातील सर्व नागरिकांना आपआपले घर व परिसर स्वछ ठेवण्याचे आवाहन ग्रामपंचायत मार्फत करण्यात आले. तर हे अभियान केवळ अभियान म्हणून नाहीतर हे एक सुंदर स्वच्छ समृद्ध गाव म्हणून ओळखन्यात यावे या साठी हा उपक्रम राबऊन महाराष्ट्रामध्ये शहापूर मजरा गावाची एक वेगळी ओळख निर्माण करायची आहे. असा निर्धार सर्व नवतरुण मंडळी व ग्रामस्थांनी केला आहे यावेळी सर्व गावकारी जेष्ठ नागरी, महिला,युवा तरुण मोठया संख्येने उपस्थित होते

## हेक्टरी आठ हजार द्यायला गवत नव्हतं पेरलं, साहेब-शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) :-राज्यात पावसाने हाहाकार माजवला त्यात मराठवाड्यात तर जास्तच पाऊस झाल्यामुळे शेतीला तलावाचे स्वरूप आले आहे. व पूर्ण पणे शेतीचे नुकसान झाले, त्यात बीड जिल्ह्यात तर शेतात माती सुद्धा राहिलेली नाही. सततच्या पावसामुळे शेतकरी हतबल झाला असून ' जगावे की मरावे ' असे झाले आहे. आमदार पासून ते थेट मुख्यमंत्री साहेबांनी पाहणी करून सुद्धा जर शेतकऱ्याला हेक्टरी ८ हजार रुपये भाव देत असाल तर असंच म्हणावे लागेल की, गवत नव्हतं पेरलं ,साहेब.



शेतातील पिके खरडून वाहून गेली, घरे उध्वस्त झाली, काही जनावरे दगावली,काही वाहून गेली, शेतकऱ्यांची घरे उघड्यावर पडली. लाख रुपयाचे नुकसान झाले. तोंडात आलेला घास वाया गेला.शेतकऱ्याच्या डोळ्यात अश्रू चा महापूर वाहू लागले. अशा प्रसंगी सरसकट ओला दुष्काळ जाहीर करायचे सोडून शासनाकडून ४० ते ५० हजार हेक्टरी भाव न देता,८ हजार रुपये भाव देऊन शेतकऱ्याची चेष्टा होत असून, जखमावर मलम लावायच्या ऐवजी मीठ चोळायचे काम शासनाकडून होत आहे असे शेतकऱ्याकडून बोलले जात आहे. शासनाकडून शेतकरी बळीराजांचे सातबारा कोरा करण्यात यावा. व तातडीने मदत जाहीर करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.हीच अपेक्षा शेतकरी शासनाकडे करीत आहे.



गेवराई - तालुक्यातील सिरसमार्ग येथील आनिल लक्ष्मण गवळी यांच्या शेतातील सोलार पंपाचे महापुराच्या पाण्याने मोठे नुकसान झाले आहे. याबरोबर शेत पिकाचेही नुकसान झालेले आहे.

## हत्ती खाना येथील शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तानचा बुरुज कोसळला

बीड (प्रतिनिधी):- गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बीड शहरातील अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेष म्हणजे हत्ती खाना परिसरात मोठे नुकसान झाले असून, येथील ऐतिहासिक शाह शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तानचा बुरुज शुक्रवार रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे कोसळला आहे. बीड शहरातील हत्ती खाना भाग हा ऐतिहासिक व दर्ग्यांमुळे प्रसिद्ध आहे.या ऐतिहासिक दर्ग्याच्या परिसरात कब्रिस्तानअसून परिसरातील नागरिक या ठिकाणी दफन विधी करतात मात्र गेल्या काही दिवसांपासून सतत पडणाऱ्या मुसळधार पावसाचे पाणी बुरुच्या भिंतीत मुरल्याने कब्रिस्तानचा बुरुज कोसळला आहे.घटनास्थळी कोसळलेल्या बुरुजचे दगड मातीचे ढिगार पडले असून या ठिकाणी मात्र,पंचनामा करण्यासाठी अद्याप संबंधित विभागाचे



अधिकारी पोहोचले नसल्याची माहिती मिळाली आहे.नागरिकांचे म्हणणे आहे की,जर प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही तर इतर बांधकामांनाही धोका निर्माण होऊ शकतो.या पार्श्वभूमीवर नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मदतीसाठी निवेदन देण्याची तयारी केली आहे.

## साऊंड आणि लाईट असोसिएशन परळी वैजनाथ याच्या कडुन परळी तहसील कार्यालय समोर उपोषणाचा तिसरा दिवस

# ढग फुटी असो किंवा अतिवृष्टी असो की पाऊस आम्ही सर्व निर्णय झाल्यानंतरच जाऊ



परळी वै (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात व परळी तालुक्यात डीजे मुक्त वातावरण निर्माण करून संपूर्ण जिल्ह्यात डीजे साऊंड सिस्टीम व मंडप लाईट असोसिएशन याच्यावर उपासमारीची वेळ आली असून शासनाने डीजे वरील बंदी उठवण्यात यावी या साठी परळी वैजनाथ तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात आज तिसरा दिवस आहे.पण शासनाला जोपर्यंत जाग यतनाही तोपर्यंत आम्ही उपोषण करणार असून पुढील काही दिवसात आम्ही अमरण उपोषण करणार आहोत असा ईशारा देण्यात आला.

भरपावसात अभाळ वारा थंडीत आम्ही लेकर बाळ सगळ सोडुन आम्ही सर्वजण एकत्र येऊन शांततेत उपोषण करत आहेत. साहेब एक डिजेची गाडी बनवीनयासाठी पधरा ते वीस लाख रुपए लागतात एका डीजे साऊंड सिस्टीम माघे दाहा जनाचे संसार चालतात साहेब तर जिल्ह्यात किती संसारात पाणी टाकले हे सांगा साहेब तुम्ही या यावरील बंदी उठवण्यात यावी याचसाठी परळी वैजनाथ तहसील कार्यालयासमोर उपोषण करीत आहेत.जर वेळीच लक्ष दिले नाहीतर पुढील निर्णय टोकाचा घेवा लागेल असा ईशारा संघटनेकडून देण्यात आला आहे.यावेळी परळी तालुक्यातील डीजे आणि साऊंड सिस्टीम लाईट असोसिएशन उपोषण चा तीसरा दिवस आहे जोपर्यंत बंदी उठवत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण करणार असून असा थेट ईशारा संघटनेने दिला आहे.यावेळी उपोषण करते.आभिजीत शेठ किरवले.आदित्य जाधव. सुमेध कसबे.श्रावण वाघमारे.बबलू गलांडे.बाबा सावंत.सचिन बाळस्कर.विजय घोटाळे.बुद्ध रतन गोखले.संकेत दहीवडे.सुनिल भागे.गोविंद वाघमारे.अनिल फड जयपाल क्षीरसागर.राहुल नागरगोजे.किशोर चाटे.मंगेश आघाव.अनिकेत वावळे.माणिक पोटभरे.अशोक सरवदे.व परळी तालुक्यातील डिजे चालक मालक व नोकर ईत्यादी उपस्थित होते.

# संत महंतांच्या मंगलमय उपस्थितीत बाजीराव पेट्रोलियमचे आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते थाटात उद्घाटन

परळी (प्रतिनिधी):- परळी शहराच्या सेवा क्षेत्राचे वैभव वाढीवणाऱ्या बाजीराव पेट्रोलियम या नावाने परळी नंदागौळ पुष बरदापुर या रोडवर रस्त्यावर अत्याधुनिक पेट्रोल पंप उभारण्यात आला असून या पेट्रोल पंपाचे आज मा. मंत्री आमदार धनंजय मुंडे. यांच्या हस्ते वसंत महंतांच्या मंगलमय उपस्थितीमध्ये उद्घाटन करण्यात आले. भर पावसात झालेल्या या शानदार समारंभात परळीत मोठ्या संख्येने विविध थरा तील नागरिक उपस्थित होते.

ज्योतिर्लिंग मंदिराच्या काही अंतरापासून परळी ते नंदागवळ रोडवर श्रद्धानंद घरकुल आश्रमासमोर उभारण्यात



आलेल्या बाजीराव पेट्रोलियम या भारत पेट्रोलियमच्या आत्याधुनिक पंपावर २४ तास इंधन सेवा उपलब्ध राहणार असून ग्राहकासाठी सर्व आधुनिक सुविधा पुरविण्यात येणार आहेत. या पेट्रोल पंपाचा शुभारंभ आज माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे. यांच्या शुभहस्ते करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी शांतीब्रह्म गुरुवर्य. ह. भ. प. प. पु. महादेव महाराज चाकरवाडीकर. धर्मगुरू प. पू. अमृतआश्रम स्वामी. आणि १०८ नंदीश्वर शिव चार्य स्वामी. महाराज. यांचे आशीर्वाद व आध्यात्मिक संतीत्रे लाभले. प्रारंभी आमदार धनंजय मुंडे. व संत महंतांच्या हस्ते विधिवत पूजा करून व फीत कापून टोल पंपाचे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थित महंतांचे पूजन व हेथोचित सन्मान बाजीराव भैया धर्माधिकारी. यांच्या परिवाराच्या वतीने करण्यात आला. तसेच आमदार धनंजय मुंडे. यांचा हृदय सत्कार करण्यात आला. उपस्थित संत महंतांनी या नव्या व्यवसायाला आशीर्वाद प्रधान केले. यावेळी उपस्थितीत मान्यवरांचा सत्कार बाजीराव पान २ वर...

# यश ढाका याच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करा

## गुन्हेगारी टोळीवर कारवाईची माजलगाव पत्रकारांच्या वतीने मागणी

माजलगाव (प्रतिनिधी): बीड जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असून अलीकडेच घडलेल्या खून प्रकरणात गुन्हेगारी टोळीचा सहभाग समोर आल्याने संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर माजलगाव तालुक्यातील विविध पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन देत संबंधित आरोपींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली



आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, बीड शहरातील टोळक्यांमधील वादातून झालेल्या खून प्रकरणात पान २ वर...

# गेवराई तालुक्यातील गोदाकाठी गावात पाण्याचा वेडा

## काही गावातील नागरिकांचे शाळेत स्थलांतर

तलवाडा (प्रतिनिधी):- गेल्या पंधरा दिवसांपासून मराठवाड्यात सतत पाऊस पडत असून मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान झाले असुन काल पुन्हा पैठण येथील नाथसागर धरणांतून होणारा गोदावरी नदी पात्रात पाणी पुरवठा वाढत असुन नदी काठ च्या गावाला सतर्कतेचा इशारा देण्यात आला असुन काल तीन लाख अठरा हजार ने क्युसेस ने पाणी सोडण्यात आले असल्याने गेवराई तालुक्यातील नदी काठी असलेले गावाना खाली करण्यात आले आहे तर त्याचे स्थलांतर तालुक्यातील विविध ठिकाणी



शाळेत शारदा प्रतिष्ठान चे माध्यमातून करण्यात आले असून अनेक समस्या ना पूरगस्त नागरिकांना मदतीचा हात देण्यात आला आहे

या बाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात गोदावरी नदीच्या काठी काही गावे वसले असुन त्यात राहेरी, गंगावाडी, भोगलगाव, राजापूर, या ठिकाणी गावात पाणी शिरले असुन येथील लोकांचे तलवाडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तर त्वरिता पुरी कॉलेज या ठिकाणी गंगावाडी राहेरी, भोगलगाव या ठिकाणचे नागरिक हलवण्यात आले असुन तर राजापुर येथील राजापूर फाट्यावर हलवण्यात आले आहे तर कटचिंचोली येथील नागरिकांना देठन या ठिकाणी हलवण्यात आले आहे तलवाडा येथे तीनशे पन्नास नागरिक स्थलांतरित झाले आहे तर अजुन ही दखल होत आहेत पान २ वर...

# स्मशानभूमीतील कुटुंबाच्या मदतीला धावला आ.धसांचा निष्ठावंत 'रमेश'

दौलावडगाव: पावसाने अनेक कुटुंब उघड्यावर आली.अन्नधान्य नसल्याने होणारी उपासमार पाहता दादेगांव, डोंगरगण, देविनिमगाव येथील लोकांना धान्यांसह रोख रक्कम देत असताना कडा येथील स्मशानभूमीतील कुटुंब उघड्यावर आल्याचे समजाताच स्वतच्या खिशातून पैसे देत आ.सुरेश (आण्णा) धस याचा निष्ठावंत, भाजपाचा 'रमेश' मदतीला धावल्याने पूरग्रस्त कुटुंब भावनिक झाल्याचे दिसुन आले.

आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथील आ सुरेश (आण्णा) धस यांचे निकटवर्तीय आणि भाजपाचे तालुकाध्यक्ष रमेश गावडे यांनी अनेक पूरग्रस्त लोकांना मदतीचा हात पुढे करत आधार दिला.या काळात ही मदत तोकडी असली तरी उभा राहण्यासाठीचा आधार मानला गेला.गावात व परिसरातील लोकांनाच नव्हे तर कडा शहरातील शेवटचा घटक



असलेल्या स्मशानभूमीतील एक कुटुंब देखील पुराच्या पाण्याने उघड्यावर आले होते.ना घर ना अन्नधान्य काहीच शिल्लक राहिले नाही.पूराच्या पाण्यात सगळेच वाहून गेले होते.या कुटुंबाला फुल ना फुलांची पाकळी देऊन सामाजिक दायित्व जपण्याचे मनात येताच क्षणाचाही विलंब न करता रमेश गावडे यांनी कडा शहराचे माजी सरपंच रमेश शिरोळे,पत्रकार रघुनाथ कर्डिले, मयुर चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते राजू पवणे यांना सोबत घेऊन स्मशानभूमीतील कुटुंबाला रोख स्वरूपात पाच हजार रूपये देऊन मदतरूपी आधार दिला.आ.धस याचे निष्ठावंत आणि भाजपाचा 'रमेश' मदतीला धावून आल्याचे दिसून आले.

# आईचे स्वप्न झाले पूर्ण - यश मुळे यांची MBBS मध्ये निवड

## सर जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे मिळवला प्रवेश

दौलावडगाव (प्रतिनिधी) - धामणगावचा होतकरू विद्यार्थी यश राजेंद्र मुळे याने आपल्या परिश्रम, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर सर जे.जे. रुग्णालय, मुंबई (Grant Medical College Sir J. J. Group of Hospitals) येथे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला आहे. अवघ्या काही दिवसांपूर्वीच यशच्या आईचे प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. घरातील या आघातानंतर संपूर्ण कुटुंब दुःखात बुडाले होते. मात्र, आईचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार करून यशने अभ्यासात खंड पडू दिला नाही. प्राथमिक शिक्षण नाही जिल्हा परिषद प्रा शाळा धामणगाव येथे झाले व पुढील शिक्षण लातूर येथे आरसीसी क्लासमध्ये पूर्ण केले, आईच्या आशीर्वादासह केलेल्या अथक मेहनतीचे फळ त्याला अखेर मिळाले.



### आईचे स्वप्न - मुलगा डॉक्टर व्हावा

यशच्या वडिलांनी भावना व्यक्त करताना सांगितले, आईला डॉक्टर व्हायचे स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी यशने खूप मेहनत घेतली. तिच्या आशीर्वादामुळेच त्याला हे यश मिळाले आहे. तिच्या डोळ्यांदेखत ही बातमी ऐकायला मिळाली असती तर ती सर्वांत आनंदी झाली असती. यशच्या जवळच्या नातेवाईकांनी सांगितले की, आईने आयुष्यभर मुलाच्या शिक्षणासाठी खूप कष्ट केले. तिचे स्वप्न पूर्ण झाले हेच तिच्या आत्म्यास सर्वांत मोठा दिलासा ठरेल.

### शिक्षक व ग्रामस्थांचा अभिमान

यशने शालेय जीवनात नेहमीच उत्कृष्ट कामगिरी केली आहे. स्पर्धा परीक्षा, कठोर अभ्यास आणि मार्गदर्शकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे त्याचा आत्मविश्वास पान २ वर...

# ओला दुष्काळ जाहीर करून ५० हजारांची मदत द्या : उपसरपंच बापू सावंत पुसरा

वडवणी (प्रतिनिधी):- तालुक्यात सततच्या मुसळधार पावसाने महापुर येऊन, नदी, नाले दुथडी भरून वाहत असुन,



यामुळे अतिवृष्टी झाल्याने गायरान धारकासह शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तरी महाराष्ट्र सरकारने वडवणी तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून, गायरान धारकासह सर्व शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रू. नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी पुसरा गावचे उपसरपंच बापू सावंत यांनी केली आहे. वडवणी तालुक्यात सर्वत्र सतत मुसळधार पाऊस पडत असल्याने

तालुक्यातील सर्व नदी, नाले, ओढे दुथडी भरून वाहत आहेत. तर सततच्या मुसळधार पावसाने तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील खरीपाच्या पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे व शेतातील माती देखील वाहुन गेली आहे, पिके पाण्यात तरंगत असल्याचे विदारक चित्र दिसत आहे.

या पावसाने तालुक्यात सर्वत्र अतिवृष्टी होऊन, शेती पिके होत्याची नव्हती झाली आहेत. यामुळे शेतकऱ्यांनी जीवपाड जपलेली पीके हातची गेल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी येत आहे. एकुणच वडवणी पान २ वर...

*विनायक बंप्पा मुळें यांच्या फोनची उपविभागीय अधिकाऱ्यांनी दखल घेतली*

# रेल्वे पुलाखालील पाणी काढुन दिले

वडवणी (प्रतिनिधी): वडवणी-चिंचवण रोडवरील रेल्वे पुलाखाली पाऊस आला की, पाच फुट उंचीचा डोह साचतो, हे नित्याचेच झाल्याने, डोंगरपट्ट्याचा संपर्क वडवणी शहराशी तुटतो, आठ दिवसापूर्वी शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे यांनी याच पुलाखाली पाण्यामध्ये अर्ज नग्न आंदोलन केले, परंतु आज तीच परिस्थिती ओढवली, त्यांनी शिवसेना स्टाईलने उपविभागीय अधिकारी यांना फोन केला, विनायक सुळेंच्या फोनची दखल घेत एस.डी एम. स्वतः घटनास्थळी दाखल झाले, रेल्वेच्या अधिकाऱ्यांना वोलावून घेतले, पोकलेन वोलून घेतली, व पाण्याला रस्ता मोकळा करून देत पाण्याचा निचरा होईपर्यंत ते स्वतः त्या ठिकाणी थांवले, रेल्वे पुलाखाली पाण्याचा निचरा झाल्याने देवी भक्तांनी



व स्वामी समर्थ भक्तांनीतसेच डोंगरपट्ट्यातील नागरिकांनी शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे यांचे आभार मानले.

अंवाजोगाई, धारूरला जाण्यासाठी सर्वत जवळचा मार्ग वडवणी चिंचवण हा असल्याने या रोडवरुन हजारो वाहने वाहतूक करतात, परंतु या रस्त्यावर रेल्वे पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT